International Journal of Advances in Engineering and Management (IJAEM)
Volume 2, Issue 8, pp: 667-669 www.ijaem.net ISSN: 2395-5252

# पर्यावरणीय न्याय आणि साहित्य चव्ठवव्ठ

Dr. Ujjwala Wanjari
*Associate Professor, J.M. Patil College, Bhandara*

Date of Submission: 01-11-2020 Date of Acceptance: 15-11-2020

**ABSTRACT:**पर्यावरणीय न्याय" ही संकल्पना १९८० च्या दशकाच्या आरंभीच्या काव्णत अमेरिकेत उदयासआलीत. या संकल्पनेतून दोन अर्थ प्रतीत होतात. एक पर्यावरणीय फायदे ज्या चव्ठ्वव्ठीतून वर्णन केल्या जाते. दुसरा अर्थ "सामाजिक विज्ञान" साहित्याचाएक आंतरशास्त्रीय संबंध प्रस्थापित करून समाजातील पर्यावरणीय भेदभावावर न्यायाने लक्ष देणे.

सामाजिकदृष्ट्या वर्चस्व असलेल्या गटाने नेहमीचे आपले श्रेष्ठत्व दुसच्या गटांवर लादून सामाजिक,आर्थिक, सांस्कृतिक, राजकिय आणि धार्मिक दहशतवाद प्रस्थापित केला आहे. जगातील सर्वच मानवी संस्कृतीचा अभ्यास करता हे प्रकर्षनि लक्षात येते. अशी अन्यायी व्यवस्था उलथून टाकण्यासाठी राजकीय आणि सामाजिक कराता जगभर झालेल्या आहे. फ्रेंच राजक्रांती, रशियन राज्यक्रांती, अमेरिकेतील निग्नो चव्ठवव्ठ, भारतातील मध्ययुगातील संत चव्ठवव्ठ आणि आधुनिक कालखंडातील सामाजिक प्रबोधनाची चव्ठवत्ठ. या सर्व चव्ठवव्वींचा अभ्यास केला तर एक गोष्ट प्रकषनि जाणवते ती म्हणजे या सर्व चव्ठवव्ठी यशस्वी झाल्या त्या क्रांतिकारी साहित्यांमुब्ठे. पर्यावरणीय न्यायव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी साहित्याने फार मोठी भूमिका वठविली आहे.

"पर्यावरणीय न्याय आणि वाङ्मय चव्ठवत्ठ" या विषयावर लेखन करताना मी फक्त अमेरिकन निग्रो साहित्याच्या अंगनेच आपला विचार प्रस्तुत करणार आहे. हुर/फण :

1)Environmental Justice – The quest for environmental justice is a social, political and moral struggle for human rights. (Environmental Justice : Gioganny Di Chiro)

2) Activism: A doctrine or Practice that emphasizes direct vigorous action

अमेरिकेतील निग्नोंची गुलामगिरी वंश आणि वर्ण ( [२८०९ ||0 ८0]0प्रा ) या दोन गोष्टीवर आधारलेली होती. 'काव्ण' रंग हा अशुभ असतो म्हणून निग्रो हा अपवित्र आहे ही बाब निग्रोंवर लादण्यात आली.

त्यांची गुलामगिरी वंशपरंपरागत नव्हती, तर त्यांच्या संबंध चेहत्यावर आणि अंगावर फासलेली होती म्हणूनच एक कवी म्हणतो,

WHAT DID I DO
TO BE SO BLACK
AND BLUE?

निग्नोंना या न्यूनगंडातून मुक्त केले ते अमेरिकेत उदयाला आलेल्या चव्ठ्वब्ठीने. बुकर टी वाशिंग्टन या अमेरिकन राष्ट्राध्यक्षाने निग्नोंना शिक्षणाचा व स्वावलंबनाचा अधिकार दिला, परंतु बुद्धिवादी तरुणांनीत्यांचा वैचारिक विरोध केला, कारण मानव म्हणून स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार अजूनही प्राप्त झाला नव्हता. निग्नो म्हणजे अंकल टॉम" (Uncle Tom)), एक हीन, दीन आणि परावलंबी प्राणी, ही निग्नोंची प्रतिमा तत्कालीन समाजमानसात पक्की रूजली. निग्रोंना श्वेतवर्णीय लोकांच्या बरोबरचा समानतेचा अधिकार मिव्ठवायचा होता. म्हणून्मेरिकेत ड्युबॉइस आणि नायगारा चव्ठवर्ढ, हार्लेम प्रबोधन, गार्व्हे चव्ठवव (The Garvey Movement) काव्ग्या मुस्लिमांची चव्यवव्ठ आणि डॉ. मार्टिन ल्यूथर किंग यांचे अहिंसात्मक आंदोलनांना आरंभ झाला.

ज्यूपिटर हॅमन, फिलिस व्हिटली, जेम्स वेल्डन, विल्यम ब्राऊन, चौर्लस् चेसनट, पॉल लॉरैन्स यासारखे कितीतरी लेखक कवींनी आपल्या साहित्यातून चव्ठव्हींना पाठिंबा दिला.

International Journal of Advances in Engineering and Management (IJAEM)
Volume 2, Issue 8, pp: 667-669 www.ijaem.net ISSN: 2395-5252

Lift Every Voice Ans Sing
Till Earth and Heaven Ring
Ring With the Harmonies Of Liberty

स्वातंत्रय, समता हे मूल्य घेऊन निग्नों साहित्याची जडणघडण झाली. डॉ. मार्टिन ल्यूथर किंग यांच्या डोव्ठ्स नेतृत्वाखाली निग्रोंनी दुसया महायुद्धानंतर स्वातंत्रयलढ्याच्या खडतर वाटेवर पावले टाकली. मागरिट वॉकर या कवतयित्रीने निग्रों जीवनातील वेदना व्यक्त केल्या त्याबरोबरच नव्या युगाच्या आरंभाचा आशावाद व्यक्त केला त्या म्हणतात,

„Let a new earth rise.
Let another world be born
Let a bloody peace be written in the sky.
….. Let a race of men now rise and take control.‟

दक्षिण अमेरिकेच्या मातीमधून या कवयित्रीच्या कवितेतील जीवन वास्तव आणि प्रतिमा निर्माण झालेल्या आहे.

" I want my body bathed again by southern sun
I want to rest again……."

निग्रोंच्या नागरी आंदोलनाच्या काव्ठात काव्यलेखनासोबतच मागरिट वॉकरने १९६६ मध्ये "Jubilee‟ ही कादंबरी लिहिली. या कादंबरीतून निग्नरो जीवनाचे सखोल वर्णन येते.

"Annie Allen" या पुलित्झर पारितोषक प्राप्त झालेल्या काव्यसंग्रह लिहिणाऱ्या ग्वेंडोलिन ब्रुक्स या निग्नो साहित्य चव्ठवव्ठीतील प्रसिद्ध कवयित्री होत. निग्रो लेखकाच्या वाट्याला आलेला हा पहिलाच पुरस्कार होता.

The Bronze – Ville Boys and Girls‟ (1956) आणि The Bean Eaters‟ (1960) हे त्यांचे गाजलेले काव्यसंग्रह "Maud Martha" या नावाची कादंबरी देखील त्यांनी लिहिली. डॉ. मार्टिन ल्यूथर किंगच्या हत्येनंतर त्यांनी "Riots‟ (दंगली) ही कविता लिहिली. या कवितेत, त्या म्हणतात, "A riot is the Language of the unheard‟ त्यांच्याविषयी लेखन करताना जनार्दन वाघमारे म्हणतात, "गेंडोलिन ब्रुक्स ही ब्लॅक पॉवरची समर्थक आहे. १९६९ ला तिने आफ्रिकन वेशभूषेचा स्वीकार केला. "Go African, Go Natural!‟ हा उद्घोष नीग्रो # नीग्रो जीवनात संघर्षाला फार स्त्रियांनी अमेरिकेत केला आहे. त्यांचा 'आफ्रो' हा नव्या अस्मितेचे प्रतीक आहे. महत्व आहे, कारण संघर्ष केल्यानेच अमेरिकेत नीग्रो 'भाणूस' म्हणून जगू शकेल हे या कवसयित्रीला ज्ञात आहे म्हणूनच ग्वेंडीलिन आपल्या साहित्यातून विद्रोहाची, क्रांतीची बीजे पेरते.

नाट्य लेखनात लॉरेन हँसबरी या लेखिकेचा उल्लेख करावा लागतो.'A Raisin in the sun' ही त्यांची नाट्यकृती अमेरिकन नाट्यसृष्टीत अजरामर झाली आहे. अमेरिकन नीग्रो चव्टवव्ठीत नीग्रो स्त्रियांचा वाटा फार मोठा आहे. श्रीमती आना लँगफोर्ड, श्रीमती एलरेटा मेल्टन अलेक्झांडर, मिस बारबरा जॉर्डन, श्रीमतीशर्ली एस. चिशोम, इत्यादि स्त्रियांनी न्यायव्यवस्था आणि राजकारण यावर फार मोठा प्रभाव गाजविला. नीग्रो स्त्रीच्या अंतःकरणात नवीन अस्मितेची ज्योत या स्त्रियांनी चेतविली. आज अनेक कलाब्षेत्रात नीग्रो महिलांनी यश प्राप्त केलेले आहे. जाहिरात, नियतकालिक, रंगभूमी, सिनेमा, टी .व्ही. यावर नीग्रो महिला आत्मविश्वासाने वावरते. "Mar Evans' ही कवयित्री 'I am a black woman' या कवितेत म्हणते,

„I am a black woman
tall as a cypress
Strong
beyond all definition still
defying place
and time
and circumstances
assailed
impervious
indestructible
look
on me and be
renewed‟

नीग्रो स्त्रीने आपला स्वाभिमान, अस्मिता ८०८७" केली आहे. म्हणूनच नीग्रो स्त्रीवादाचा अभ्यास आपणाला स्वतंत्रपणे करावा लागतो. इतर स्त्रियांपेक्षा नीग्रो स्त्री अधिक क्रांतीकारी वाटते.

डॉ. मार्टिन ल्यूथर किंग यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या नागरी अधिकारांच्या लब्यात अनेक स्त्रियांनी सहभाग घेतला होता. अमेरिकेत वांशिक

प्रश्नासोबतच स्त्रियांच्या गुलामगिरीचा फार मोठा प्रश्न होता. अमेर्किन निग्नो स्त्रियांचया स्थितीविषयी विवेचन करताना जनार्दन वाघमारे म्हणतात, "अमेरिकेच्या वांशिक प्रश्नांचे जाते नीग्रो स्त्रीव्या शरीराभोवती अधिक घट्टपणे विणले गेले आहे. अमेरिकेतील वंशवादाचा प्रश्न हा श्वेत नीग्रोंच्या लैंगिक संबंधाची जोडला गेला आहे. अमेरिकेच्या इतिहासातील ही एक चमत्कारिक अशी वस्तुस्थिती आहे श्वेत पुरुषांनी नीग्रो स्त्रीव्या गर्भाशयात चार शतकांचा अंधार पेरला. तिने अंधाराच्या मुलांना जन्म दिला. तिची मुले अंधार मुठीत घेऊनच जन्माला आली. त्यांच्या मुठी अंधारातच उघडल्या गेल्या. त्यांच्या डोव्व्यांगना अंधारशिवाय दुसरे काय दिसणार होते? उजेडात वावरणाच्या श्वेतांना हा अंधार पाहण्यासाठी डोब्ठेच कुठे होते?"

नीग्रो स्त्रीयांबरोबरच नीग्रो पुरुषांची प्रतिमा देखील अत्यंत तिरस्करणीय पद्धतीने समाजात ठेवण्यात आली. ही प्रतिमा बदलविण्यासाठी अनेक नीग्रो तरुण डॉ.मार्टिन ल्यूथर किंग यांच्या नेतृत्वाखाली एकत्र आले. त्यामध्ये जेम्स बॉल्डविन या लेखकाचा उल्लेख करावा लागेल. जेम्स बॉल्डविन यांची लेखणी अत्यंत विद्रोही आहे. 1963 मध्ये "„The fire Next Time‟" हे पुस्तक प्रकाशित झाले. हे त्यांचे लेखन नागरी अधिकारांच्या चव्ठवव्ठीचा एक सामर्थ्यशाली ठेवा आहे. त्यांचे "Nobody knows my name‟ आणि "Notes of a Native Son‟ हे दोन्ही निबंध संग्रह अमेरिकेत अत्यंत गाजले, "Everybody knows his name‟ अशी चर्चा अमेरिकेच्या सांस्कृतिक आणि साहित्यिक वर्तुव्गयत गाजली, 1961 साली "The American Library Association‟ या संस्थेने अत्युत्कृष्ट पुस्तक म्हणून या पुस्तकाचा गौरव केला.

स्टोकले कारमायकेल आणि चार्लस् हॅमिल्टन यांनी "Black Power‟ नावाचे पुस्तक लिहिले. या पुस्तकात कारमायकेल यांनी "Black Power‟ हा जगातील "Third Power" आहे असे विवेचन करुन अमेर्किन नीग्रोंना त्यांनी आव्हान केले की वसाहतवाद, साम्राज्यवादाच्या मगरमिठीत सापडलेले जग मुक्त झाल्यानंतर आपले स्वतंत्र अस्तित्व Black Power आपणाला प्रस्थापित करावा लागेल. अमेरिकेतील नीग्रो असो की आफ्रिकेतला यांनी वंशवादाविरुद्ध बंड पुकारले पाहिजे. राजकीय प्रबलता प्रस्थापित केल्याशिवाय अमेरिकेतील सामाजिक प्यावरण निकोप होणार नाही अशी त्यांनी स्पष्ट भूमिका घेतली. कारमायकेल म्हणतात,

In the end, we cannot and shall not offer any guarantees that black power, if achieved, would be non-racist. No one can predict human behavior. Social change always has unanticipated consequences. If black racism is what the larger society fears we cannot help them" (Black Power, P. 63) *

नीग्रोंच्या या चव्टवव्ठीतून अमेरिकन राजकारणाला भविष्यात नवे वव्ठण लागू शकते याची शक्यता कारमायकेल यांनी व्यक्त केली.

अमेरिकेत आज ‛ंशवाद' बच्याच प्रमाणात संपुष्ठात आलेला आहे. अब्राहम लिंकन यांनी स्वातंत्र्याच्या जाहिसनाम्यात समान नागरी कायद्याचा पुरस्कार केला आणि नीग्रोंना सामाजिक स्वातंत्र्य प्रदान केले. याचा परिणाम म्हणजे ओबामा" सारखे अत्यंत कर्तृत्वशाली नीग्रो राष्ट्राध्यक्ष अमेरिकेला लाभले. नीग्रोंनी वंशवादाविरुद्ध उभारलेल्या लढ्बाची परिणिती ही की, आज अमेरीकेच्या भूमीवर स्वातंत्र्याची देवता प्रस्थापित झालेली आहे.

**संदर्भ :**

१. जनार्दन वाघमारे, अमेरिकन नीग्रो : साहित्य आणि संस्कृति लोकवाडमय गृह, प्रा. लि., मुंबई, प्र.आ. 1978 पृ.227 1978

२. जनार्दन वाघमारे, , नि. पृ.212

३. स्टोकले कारमायकेल, (Black Power, उनि पृ 54